भारतीय संविधान साक्षरतेचा अभ्यास
(विशेष संदर्भ-परभणी जिल्हा)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव विज्ञान विद्याशाखेंतर्गत 'राज्यशास्त्र' विषयातील
पीएच्.डी. (विद्यावाचस्पती) पदवीसाठी सादर करावयाचा
संशोधन आराखडा

संशोधक

सचिन पंडित कांबळे

एम.ए., बी.एड.

मार्गदर्शक

प्रा.डॉ. विश्वंभर धर्मा गायकवाड

एम.ए., नेट, पीएच.डी., एलएलएम

राज्यशास्त्र विभागप्रमुख

शिवाजी महाविद्यालय, उदगीर

ता.उदगीर जि.लातूर.

संशोधन केंद्र

पीपल्स कॉलेज, नांदेड

डिसेंबर - 2024

भारतीय संविधान साक्षरतेचा अभ्यास (विशेष संदर्भ-परभणी जिल्हा)

- **प्रस्तावना (Introduction) :**

लोकशाही शासनव्यवस्था चालविण्यासाठी प्रत्येक देशाला राज्यघटना आवश्यक असते. १५ ऑगस्ट १९४७ रोजी देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतातसुद्धा राज्यघटना निर्मितीची प्रक्रिया गतिमान झाली. १९४२ च्या 'चले जाव' चळवळीनंतर इंग्रजांनी देश सोडून जाण्याचे जवळपास निश्चित केले होते. तेव्हापासूनच भारतातील संभाव्य लोकशाही राज्यव्यवस्थेची स्वप्ने रंगविण्यात येत होती. घटना समिती गठित करण्यात आली होती. देशोदेशीच्या राज्यघटनांचा अभ्यास सुरू झाला होता. भारतासारख्या विशाल बहुसांस्कृतिक, बहुभाषिक आणि बहुधार्मिक देशासाठी कशा प्रकारची राज्यघटना असावी याचा अभ्यास सुरू झाला होता. राज्यघटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष या नात्याने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेला आकार देताना भारतीय संविधानामध्ये भारताच्या ऐतिहासिक समृद्ध सांस्कृतिक आणि वैचारिक वारशाची नोंद घेत, महान दार्शनिक विचारांचा समावेश घटनेत केला. तसेच भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीमध्ये फ्रेंच राज्यक्रांतीकडून मिळालेले स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मूल्येही स्वीकारली आहेत. अमेरिका या राष्ट्राकडून घटनेत मूलभूत अधिकाराची संकल्पना घेण्यात आलेली आहे. आयर्लंडच्या संविधानातून मार्गदर्शक तत्त्वे घेण्यात आलेली आहेत. इंग्लंडच्या राज्यघटनेतून संसदीय लोकशाही हा घटक समाविष्ट करण्यात आलेला आहे.

लोकशाही संविधानाचा उगम प्रथम इंग्लंडमध्ये झाला. नंतर इंग्रजांनी भारताला स्वातंत्र्य देण्याचे निश्चित झाले. इसवी सन १९४६ साली 'कॅबिनेट मिशन' ची स्थापना झाली. त्यानंतर भारतीय राज्यघटना तयार करण्यासाठी प्रातिनिधीक संविधान समिती निर्माण झाली. या संविधान सभेचे अध्यक्ष राष्ट्रपती डॉ.राजेंद्रप्रसाद हे होते. मसुदा समितीचे अध्यक्ष हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर होते. भारतीय राज्यघटना ही संघराज्य

स्वीकारणारी व लोकशाही जोपासणारी आहे. भारतीय राज्यघटना संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अहोरात्र मेहनत घेत लिहून पूर्ण केली. भारतीय संविधान तायार होण्यास २ वर्ष, ११ महिने आणि १८ दिवसांचा कालावधी लागला. भारतीय संविधान सभेने २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान स्वीकारले, त्यामुळे भारतात २६ नोव्हेंबर हा दिवस "भारतीय संविधान दिन" म्हणून साजरा केला जातो व २६ जानेवारी १९५० रोजी लागू करण्यात आले. संविधान संपूर्ण रूपाने २६ जानेवारी १९५० रोजी लागू झाले. त्यामुळे २६ जानेवारी हा दिवस "भारतीय प्रजासत्ताक दिन" म्हणून साजरा केला जातो.

भारतीय जनतेने २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय संविधानाचा स्वीकार केला असून, त्याच दिवशी भारतीय संविधानाची अंमलबजावणी सुरू झाली. तेव्हापासून भारत एक स्वतंत्र, सार्वभौम, लोकशाही राष्ट्र बनले आहे. भारतीय संविधानाला २०२५ मध्ये ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. या काळात देशातील लोकांना एक गोष्ट आवश्यक होती, ती म्हणजे संविधान साक्षर करणे. अलिकडे आपण शालेय जीवनापासून संविधान उद्देशपत्रिकेचे वाचन करत आहोत. पण या उद्देशपत्रिकेचा अर्थ काय आहे हे समजून घेण्याचा प्रयत्न किंवा उद्देशपत्रिका सविस्तरपणे वाचण्याचा कधी प्रयत्न जास्त प्रमाणात होताना दिसून येत नाही. या ग्रंथाच्या आधारावर संपूर्ण देशाचे राजकारण समाजकारण चालते तो ग्रंथ किती लोकांनी वाचला आहे, हा चिंतनाचा विषय आहे. त्यामुळे 'संविधान साक्षरता' ही काळाची गरज बनली आहे.

परभणी जिल्हा हा महाराष्ट्रातील मराठवाडा विभागात येतो ज्याला पूर्वी प्रभावती नगर म्हणूनही ओळखले जाते. हा मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांपैकी एक जिल्हा आहे. हा संपूर्ण मराठवाडा प्रदेश एक जिल्हा भौगोलिक प्रदेश पूर्वीचा निजाम राज्याचा एक भाग होता. नंतर हैदराबाद राज्याचा एक भाग होता. १९५६ मध्ये राज्याच्या पुनर्रचनेनंतर तत्कालीन मुंबई राज्याचा भाग बनला आणि १९६० पासून तो राज्याचा भाग बनला आहे. परभणी जिल्ह्याची लोकसंख्या घनता ही २९३ प्रती चौरस

कि.मी. (७६० चौ. मैल) असून परभणी जिल्ह्याचा साक्षरता दर ७५.२२% आहे. परभणी जिल्ह्यामध्ये संविधानिक साक्षरता ही कमी प्रमाणात दिसून येत आहे. यामुळे परभणी जिल्ह्यातील संविधान साक्षरता पडताळणी करण्यासाठी हा विषय मी निवडलेला आहे. याची पडताळणी करून सखोल अभ्यास करण्यात येईल.

शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावर 'संविधान साक्षरता' यासाठी विविध उपक्रम आणि कार्यक्रमांचे आयोजन करणे आवश्यक आहे. विद्यापीठ स्तरावर परिषदा, चर्चासत्रे होणे आवश्यक आहेत. भारतासारख्या बहुसांस्कृतिक, बहुभाषिक देशात एकता आणि अखंडता निर्माण करण्यासाठी तसेच समता, बंधुता आणि न्याय ही मूल्ये लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी संविधानाची साक्षरता सार्वत्रिक करणे आवश्यक आहे. याच उद्देशाने प्रस्तुत संशोधनासाठी हा विषय निवडण्यात आला आहे.

- **पूर्व साहित्याचा आढावा (Review of Literature):**

प्रस्तुत विषयाच्या संदर्भात आजवर झालेल्या संशोधनाचा तसेच विविध स्तरीय अभ्यासाचा आढावा सदरील संशोधनामध्ये घेण्यात येईल.

यापूर्वी भारतामध्ये सर्वेक्षण करण्यात आले होते. भारतातील केरळ राज्यातील कोल्लम या जिल्ह्यात संविधान साक्षरता सर्वेक्षण करण्यात आले होते. 2021 मध्ये कोल्लम जिल्ह्याला संविधान साक्षरता जिल्हा म्हणून घोषित करण्यात आले या उपक्रमाचा उद्देश लोकांमध्ये भारतीय संविधान त्यांच्या हक्क कर्तव्य या कायद्याविषयी जागृत करणे आहे.

१. राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाचा अभ्यास (२०१२): राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाने अल्पसंख्याकांसाठी संविधानिक तरतुदींबद्दलची जागरूकता विश्लेषित केली. यामध्ये असे आढळले की भारतातील अनेक अल्पसंख्याकांना त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणाऱ्या तरतुदींविषयी मर्यादित ज्ञान होते. या अभ्यासात या संवेदनशील गटांना संविधानाबद्दलची माहिती अधिक प्रभावीपणे पोहोचवण्याची आवश्यकता व्यक्त केली.

२. राष्ट्रीय संविधान साक्षरता मोहीम: भारत सरकारने संविधानाबद्दल जागरूकता वाढविण्यासाठी विविध मोहिमा हाती घेतल्या आहेत. उदाहरणार्थ, २०१५ मध्ये कायदा आणि न्याय मंत्रालयाने नागरिकांमध्ये, विशेषत: तरुणांमध्ये संविधान साक्षरता वाढवण्यासाठी एक मोहीम सुरू केली. या मोहिमांचा उद्देश मूलभूत अधिकार, कर्तव्ये आणि संविधानाची महत्त्वता याबद्दल जागरूकता वाढवणे उद्देश होता.

३. भारतीय सोशल इन्स्टिट्यूटचा सर्वेक्षण (२०१७): भारतीय सोशल इन्स्टिट्यूटने केलेल्या एका सर्वेक्षणात शहरी आणि ग्रामीण भागातील तरुणांमध्ये भारतीय संविधानाबद्दल जागरूकतेचे स्तर समजून घेतले. यामध्ये असे दिसून आले की शहरी भागात आणि विशेषत: विद्यार्थ्यांमध्ये संविधान साक्षरता जास्त होती, तर ग्रामीण लोकसंख्येमध्ये संविधानाच्या मूलभूत संकल्पनांबद्दल, जसे की प्रँबल, मूलभूत अधिकार आणि निर्देश तत्वज्ञानाबद्दल ज्ञान कमी होते. असे यात दिसून येते.

४. शाळांमधील संविधान साक्षरतेवर संशोधन (२०१९): "इंडियन जर्नल ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन" मध्ये प्रकाशित झालेल्या एका संशोधनात शैक्षणिक संस्थांचे संविधान साक्षरतेला प्रोत्साहन देण्यात काय भूमिका आहे हे शोधले. यामध्ये शाळेच्या अभ्यासक्रमात संविधान शिक्षण समाविष्ट करण्याची आवश्यकता आणि संविधानाबद्दलची मर्यादित ओळख विशेषतः ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये कमी जागरूकतेला कारणीभूत ठरते, असे सांगितले आहे.

संविधानाची ऐतिहासिक पार्श्वभूमी:

१. संविधान तयार करण्याच्या प्रक्रियेतील विविध नेत्यांचे विचार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान, आणि संविधानाने घालून दिलेली मूलभूत तत्त्वे यावर

बरीच साहित्ये उपलब्ध आहेत. उदाहरणार्थ, भारतीय संविधान हे ग्रंथ भारतीय संविधानाची सखोल माहिती देतात.

२. लोकशाही प्रक्रियांमध्ये नागरिकांचा सहभाग : संविधान साक्षरतेमुळे नागरिकांचा मतदान, कायद्याचे पालन, आणि शासन प्रक्रियेत सहभाग कसा वाढतो, यावर अभ्यास केला गेला आहे.

३. मूलभूत हक्क आणि कर्तव्यांविषयी जागरूकता : संशोधनातून असे दिसून आले आहे की अनेक लोकांना संविधानाने दिलेले हक्क माहीत नसतात, विशेषतः अनुसूचित जाती-जमाती, महिलांचे हक्क, वंचित घटकांची विशेष तरतुदी याविषयी अज्ञान असते.

- UNESCO आणि UNDP च्या अहवालांमध्ये संविधान साक्षरतेचा लोकशाहीच्या बळकटीकरणाशी असलेला संबंध अधोरेखित केला आहे.

४. शैक्षणिक पद्धतीतील संविधान साक्षरता : शालेय शिक्षणात संविधान साक्षरतेला प्राधान्य दिल्याने विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक न्याय व समता यांची जाणीव वाढते, असे अनेक अभ्यास दाखवतात. काही संशोधकांनी सुचवले आहे की, संविधानाचे शिक्षण केवळ पुस्तकापुरते न ठेवता प्रात्यक्षिक व कार्य शाळांद्वारे शिकवले पाहिजे.

५. संविधान साक्षरतेतील आव्हाने: ग्रामीण व शहरी भागांतील संविधान साक्षरतेमधील तफावत, शैक्षणिक पातळीतील असमानता, आणि भाषिक अडचणींमुळे संविधानाची माहिती सर्वांपर्यंत पोहोचत नाही. “Indian Journal of Public Administration” मध्ये प्रकाशित अभ्यासांनी संविधान साक्षरतेसाठी प्रभावी धोरणांची गरज अधोरेखित केली आहे.

६. संविधान साक्षरता आणि सामाजिक न्याय: अनुसूचित जाती-जमाती, महिलांचे हक्क, आणि अल्पसंख्याकांचे प्रश्न सोडवण्यासाठी संविधान साक्षरता कशी महत्त्वाची आहे, यावर अभ्यासकेंद्रित आहेत.

- **संशोधनाची उद्दिष्टे (Objectives):**

प्रस्तुत संशोधनासाठी खालीलप्रमाणे उद्दिष्टे निश्चित करण्यात आलेली आहेत.

i) संविधान साक्षरता ही संकल्पना समजून घेणे.

ii) संविधानाची रचना, मूल्यांची माहिती करून घेणे.

iii) संविधानाबद्दलच्या माहितीचा जनतेमधील ज्ञानाचा अभ्यास करणे.

iv) समाजातील सर्व घटकांत संविधानाबद्दलची माहिती जाणून घेणे.

v) परभणी जिल्ह्यातील जनतेतील संविधान माहितीचा स्तर अभ्यासणे.

vi) संविधान साक्षरतेच्या अभावाच्या परिणामांचा अभ्यास करणे.

vii) संविधानिक नितिमत्ता व जनतेची जबाबदारी तपासणे.

- **गृहितके(Hypothesis):**

प्रस्तुत संशोधनासाठी खालील गृहितके गृहित धरण्यात आलेली आहेत.

i) संविधानाबद्दलचे ज्ञानही जनतेचे प्राथमिक कर्तव्य पाहिजे.

ii) हक्क व अधिकाराच्या रक्षणासाठी संविधानाची माहिती असणे गरजेचे आहे.

iii) लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी संविधान साक्षरता आवश्यक आहे.

iv) परभणी जिल्ह्यातील सामान्य जनतेला संविधानाच्या ज्ञानाची अपुरी माहिती आहे.

v) संविधान साक्षरतेअभावी परभणीकरांचा लोकशाहीतील सहभाग कमी दिसते.

- **संशोधन पद्धती (Research Methodology):**

प्रस्तुत संशोधनाचा अभ्यास करण्यासाठी प्रामुख्याने वर्णनात्मक व विश्लेषणात्मक अध्ययन पद्धतीचा अवलंब केला जाणार आहे.

तथ्य संकलन:

सदर विषयाची सविस्तर व सखोल मांडणी करण्याच्या दृष्टीने तथ्य संकलनाकरिता दोन पध्दतीचा अवलंब करण्यात येणार आहे.

१. प्राथमिक स्त्रोत:

अभ्यासासाठी निवडलेल्या संशोधन विषयाची माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने त्यात मुलाखत, प्रश्नावली अनुसूची तयार करून त्यानुसार प्रश्न विचारून विषयाला अनुसरून आवश्यक ती माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. तसेच अनौपचारिक स्वरूपाची चर्चा करूनही काही गोष्टीची माहिती अभ्यासासाठी संकलित करण्यात येणार आहे.

२. द्‌वितीय स्रोत:

यामध्ये संविधान, विविध संदर्भग्रंथ, मासिक, सदरविषयाच्या संदर्भातील पुस्तके, वृत्तपत्रे, लेख, संशोधकांनी सादर केलेले शोधनिबंध, शासकीय अहवाल, आकडेवारी, इंटरनेट, नियतकालिके, इत्यादीतून उपयुक्त अशी माहिती गोळा करून विषयाची सविस्तर मांडणी करण्यात येणार आहे.

नमुना निवड:

प्रस्तुत संशोधन कार्य पूर्णत्वास नेण्यासाठी परभणी जिल्हयाचा संदर्भ लक्षात घेऊन संभाव्यता नमुना निवड पध्दतीमधील साधा यादृच्छिक नमुना निवड पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे.

परभणी जिल्हयातील परभणी, गंगाखेड, सोनपेठ, पाथरी, मानवत, पालम, सेलू, जिंतूर, पूर्णा असे एकूण नऊ तालुक्यातून विद्‌यार्थी-विद्‌यार्थींनी १००, शेतकरी व शेतमजूर-१००, कर्मचारी-१००, सामाजिक कार्यकर्ते- १०० असे एकूण ४०० उत्तरदात्याची निवड करुन तथ्य संकलन करण्यात येणार आहे.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा:

प्रस्तुत संशोधनाचा विषय हा देशपातळीवरील असला तरी या अव्याप्त विषयाच्या मर्यादित घटकाने अभ्यास करणे शक्य नसते. तसेच महाराष्ट्रातील सर्वच

जिल्ह्यातील संविधान साक्षरतेचा अभ्यास या विषयाची व्यापकता लक्षात घेऊन परभणी हे क्षेत्र मर्यादित करण्यात आले आहे.

संशोधनाचे महत्त्व (Importance of the Study):

भारतीय संविधान हा प्रत्येक भारतीय नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ असून, त्याबाबतची जागरूकता वाढीस लागणे अत्यंत आवश्यक आहे. देशाला एकता आणि अखंडता याबरोबरच मानवी मूल्यांची शिकवण आवश्यक आहे. यासाठी संविधानासारखा महत्त्वाचा ग्रंथ प्रत्येकाने समजून घेणे आवश्यक ठरते. याबाबतीत सदरील विषयाच्या माध्यमातून लोकजागृती घडवून आणण्यासाठी या विषयाचे महत्त्व खास आहे. म्हणूनच हा विषय संशोधनासाठी निवडण्यात आला आहे.

- **संशोधनाची व्याप्ती व मर्यादा (Scope and Limitation of the Study):**

प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेला विषय हा 'भारतीय संविधान आणि बाबतची लोक साक्षरता' असा व्यापक असून, प्रस्तुत विषयाची व्यापकता लक्षात घेऊन परभणी जिल्हा हे क्षेत्र मर्यादित करण्यात आलेले आहे.

- **प्रकरण योजना (Chapter Scheme):**

'भारतीय संविधान साक्षरतेची गरज' (विशेष संदर्भ-परभणी जिल्हा) या विषयावरील संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी खालीलप्रमाणे प्रकरणांचे आयोजन केले आहे.

प्रकरण पहिले - प्रस्तावना

प्रकरण दुसरे - संदर्भ साहित्याचा आढावा आणि संशोधन पद्धती

प्रकरण तिसरे - परभणी जिल्ह्याची पार्श्वभूमी

प्रकरण चौथे - भारतीय संविधान साक्षरता: संकल्पना आणि स्वरूप

प्रकरण पाचवे - परभणी जिल्ह्यातील संविधान साक्षरता

प्रकरण सहावे - निष्कर्ष व समारोप

संदर्भ ग्रंथ सूची

१. 'भारताचे संविधान', शब्दवेध बुक हाऊस, औरंगाबाद, २३ फेब्रुवारी २०२०

२. खोसला माधव, 'भारतीय संविधान संक्षिप्त परिचय', मराठी भाषांतर : अवधूत डोंगरे, मधुश्री पब्लिकेशन, पुणे, २१ नोव्हेंबर २०२३

३. पाटील डॉ.अभिजीत, साके प्रा.लक्ष्मण, 'भारतीय राज्यघटनेची ओळख', सनय प्रकाशन, १ जानेवारी २०२१

४. जाधव तुकाराम व शिरपूरकर महेश, 'भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया', युनिक अकादमी, पुणे

५. पाटील प्रा.व्ही.बी., 'भारताची राज्यघटना साध्या सोप्या भाषेत'-, के. सागर पब्लिकेशन, पुणे, १ जानेवारी २०१७

६. भोळे डॉ.भास्कर लक्ष्मण, 'भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण', पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स, नागपूर, १ जानेवारी २०१५

७. मोताळे डॉ.बाबासाहेब त्रिंबक, 'भारतीय संविधानाची ओळख', अथर्व पब्लिकेशन, १५ ऑगस्ट २०२२

८. झांबरे स.ध. 'आपली राज्यघटना', संकेत प्रकाशन, नागपूर, २७ मार्च २०२०

९. डे रोहित, 'लोकांचं संविधान', भाषांतर : डोंगरे अवधुत, मधुश्री पब्लिकेशन, पुणे, १ जुलै २०२३

१०. Indian Polity-M. Laxmikant, Trans. Shrikant Gokhale, K Sagar Publication, 11 Sept. 2012

११. घाटोळे रा.ना., 'समाजशास्त्रीय संशोधन तत्त्वे व पध्दती', श्री मंगेश प्रकाशन,

१२. कऱ्हाडे बी.एम., 'शास्त्रीय संशोधन पध्दती', पिंपळापुरे पब्लिशर्स, नागपूर, तृतीय आवृत्ती- २०११.

१३. आगलावे प्रदिप, 'संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे', विद्या प्रकाशन, नागपूर. २०००.

१४. बोधनकर व अनोली, 'सामाजिक संशोधन पध्दती', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००३

१५. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन अहवाल, परभणी- २०२०.

संशोधक
सचिन पंडित कांबळे
एम.ए., बी.एड.

मार्गदर्शक
प्रा.डॉ.विश्वंभर धर्मा गायकवाड
राज्यशास्त्र विभागप्रमुख
शिवाजी महाविद्यालय, उदगीर
ता.उदगीर जि.लातूर.